# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर महावितरणने जारी केलेल्या वाणिज्य वापरासाठीची बिले मीटर रिडिंगद्वारे देण्याबाबत

**(१) ४३२७ (१४-०९-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर महावितरणने जारी केलेल्या वाणिज्य वापरासाठीच्या एप्रिल महिन्याच्या देयकाला स्थगिती देऊन ठाणे शहरात सरासरीऐवजी मीटर रिडिंगद्वारे देयक देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी (कोकण पदवीधर) मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक ६ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व या निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) व (२) बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांनी दिनांक २६/०३/२०२० रोजी प्रसारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार COVID-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव झालेला असल्यामुळे, वीज ग्राहकांचे प्रत्यक्ष मीटर वाचन न करता ग्राहकांच्या मागील तीन महिन्याच्या वीज वापराच्या सरासरीतून वीज देयके देण्याबाबत निर्देश देण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने ठाणे शहरातील ज्या वाणिज्य ग्राहकांच्या मीटरमध्ये स्वयंचलित मीटर वाचन प्रणाली आहे व ज्या ग्राहकांनी स्वत: आपले प्रत्यक्ष मीटर वाचन मोबाईल ॲपव्दारे महावितरणला कळविलेले होते अशा ग्राहकांना त्यांच्या प्रत्यक्ष वापरानुसार व उर्वरित ग्राहकांना त्यांच्या वीज वापराच्या सरासरी नुसार लॉकडाऊन काळात वीज देयके देण्यात आलेली होती. ग्राहकांचे मीटर वाचन उपलब्ध झाल्यानंतर सरासरी देण्यात आलेले वीज देयक हे त्यांच्या प्रत्यक्ष असलेल्या वीज वापरानुसार समायोजित करण्यात आले.

लॉकडाऊनच्या काळात व्यापारी वीज ग्राहकांचे माहे एप्रिल, मे व जून, २०२० च्या वीज देयकामध्ये लागू असलेले स्थिर आकार स्थगित करण्यात आलेले होते व ते अनुक्रमे माहे ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२० या महिन्यांच्या वीज देयकांमध्ये समाविष्ट करण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकेतरांच्या आकृतिबंध व वरिष्ठ वेतनश्रेणीबाबत

**(२) ८६८२ (२०-०७-२०२१) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही शाळांमध्ये एकही लिपिक अथवा शिपाई नसल्यामुळे तसेच आकृतिबंधाची अंमलबजावणी न झाल्यामुळे शालेय व्यवस्थापन व शाळेचे दैनंदिन कामकाज प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना २४ वर्षे पूर्ण होऊनही वरिष्ठ वेतनश्रेणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकेत्तरांच्या आकृतिबंध व वरिष्ठ वेतनश्रेणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२०-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ अन्वये राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशतः/पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतिबंध लागू करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे दिनांक ०७/०३/२०१९ अन्वये आकृतीबंधाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २४ वर्षे सेवेनंतर सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देणेबाबत वित्त विभागाने मंत्रिमंडळ टिप्पणी सादर करावयाचे निर्देश दिलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा (जि.सातारा) परिसरात महिलेवर पेट्रोल ओतून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडल्याबाबत

**(३) ८७४२ (१४-०६-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा (जि.सातारा) परिसरात दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी महिला दिनी दिवसा रस्त्यावर एका महिलेवर पेट्रोल ओतून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेला तीन दिवस होऊनही पिडित महिलेची तक्रार स्थानिक पोलिसांनी नोंदवून घेतली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१), (२) व (३) प्रश्नाधिन घटना दिनांक ०८/०३/२०२१ रोजी सातारा जिल्ह्यात घडल्याची बाब जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस ठाण्यात दाखल नाही. तथापि, महिलेवर पेट्रोल टाकल्याबाबत पोलीस स्टेशन सातारा, औरंगाबाद शहर येथे एक तक्रार अर्ज प्राप्त झाला होता.सदर तक्रार अर्जानुसार चौकशी करण्यात आली असून चौकशीत अशी घटना घडली नसल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच तक्रारदार यांना याबाबत समजपत्र देऊन तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला असल्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील व्यपगत पदांचे पुनर्जीवन व प्रस्तावित वाढीव पदांसाठी मंजुरी मिळण्याबाबत

**(४) ९४४९ (२०-०७-२०२१) श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील व्यपगत पदांचे पुनर्जीवन व प्रस्तावित वाढीव पदांसाठी मंजुरी मिळण्याबाबत शिक्षक समन्वय समिती व शिक्षक संघटनेने शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२०-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयामधील व्यपगत करण्यात आलेल्या वाढीव पदांना पुर्नजिवित करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली असून त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ११/०७/२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कार्यभार वाढल्यामुळे निर्माण होणाऱ्या उर्वरित वाढीव पदांवरील नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांच्या यादीसह सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयीन वाढीव पद शिक्षक कृती समितीच्या मागण्या मंजूर करण्याबाबत

**(५) १०४८० (०६-०१-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयीन वाढीव पद शिक्षक कृती समितीद्वारा शिक्षण संचालक, पुणे येथे दिनांक ०२/०९/२०२१ पासून बेमुदत आंदोलन सुरू केले असून शासनाने दखल न घेतल्याने राज्यात संघटनेच्यावतीने दिनांक ०५/०९/२०२१ पासून मुंडन व भिकमांगो आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महत्वाच्या विषयाबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व नागपूर विभागाचे शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक ०६/०९/२०२१ व दिनांक २३/०९/२०२१ रोजी पत्र पाठवून संघटनेच्या मागण्यांची तात्काळ दखल घेण्याची विनंती केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संघटनेच्या मागण्यांची दखल घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२०-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयामधील व्यपगत करण्यात आलेल्या वाढीव पदांना पुनर्जिवित करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली असून त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ११/०७/२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कार्यभार वाढल्यामुळे निर्माण होणाऱ्या उर्वरित वाढीव पदांवरील नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांच्या यादीसह सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## अकोला पोलीस आयुक्तालय व पोलीस स्टेशनचे विभाजन करुन रिक्त पदे भरण्याबाबत

**(६) १२१५५ (३०-०३-२०२२) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला पोलीस दलाच्या आकृतीबंधाला सन १९६० नंतर मंजूरी प्रदान करण्यात आली नसल्यामुळे अकोला पोलीस आयुक्तालय व पोलीस स्टेशनचे विभाजन होवू शकले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला महानगरपालिकेची हद्द २५ चौ.मी. हून १२५ चौ.मी. पर्यंत वाढलेली असून जिल्ह्यात ४२० पेक्षा जास्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने सदर ठिकाणी गुन्ह्याचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक वर्षापासून पोलीस भरतीची प्रक्रिया राबविण्यात आली नसून पोलीस उपनिरिक्षकाची ७३ पदे मंजूर असतानाही जिल्ह्यात केवळ ५० अधिकारीच कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोला पोलीस आयुक्तालय व पोलीस स्टेशनचे विभाजन करण्याबाबत तसेच रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२३) :** (१) व (२) होय.

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे |
|---|---|---|
| १) | पो.उप अधीक्षक | ३ |
| २) | सहा पो.निरीक्षक | २ |
| ३) | सहा पो निरीक्षक | २ |
| ४) | पो.उप निरीक्षक | ३४ |
| ५) | सहा पो. उप निरीक्षक | ९ |
| ६) | पो हवालदार | १७ |
| ७) | पो नाईक | २१ |
| ८) | पो अमंलदार | ३८० |
| **एकूण** | | **४६६** |

तसेच गुन्ह्यांचे प्रमाण सन २०२० - आयपीसी व एसएलएल मिळून एकूण ११८८६

सन २०२१ - आयपीसी व एसएलएस मिळून एकूण १५५४१

(३) होय, सन २०१९ मध्ये चालक पोलीस अंमलदार यांची ३४ पदांची भरती जाहिरातीप्रमाणे सन २०२१ मध्ये पोलीस भरती राबविण्यात आली आहे. तसेच पोलीस अधीक्षक, अकोला या ठिकाणी पोलीस उप निरीक्षकांची ९६ पदे मंजूर असून, त्यापैकी ६४ पदे भरलेली आहेत व ३२ पदे रिक्त आहेत. सदरची पदे बदलीने, पदोन्नतीने व सरळसेवेने भरण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) पोलीस शिपाई भरती सन-२०२१ ची अकोला जिल्हा पोलीस घटकातील पोलीस शिपाई ३२७ व चालक पोलीस शिपाई ३९ पदांकरीता दिनांक ०२/०१/२०२३ व दिनांक ०३/०२/२०२३ या कालावधीमध्ये भरती घेण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामविद्युत व्यवस्थापकांच्या मागण्यांबाबत

**(७) १५७५८ (२८-१२-२०२२) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रवीण दटके, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामविद्युत व्यवस्थापकांच्या मागण्यांबाबत ग्रामविकास मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ जून, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत ग्रामविद्युत व्यवस्थापकांचे सर्व नियंत्रण एकाच विभागाकडे देण्याचे निर्देश ऊर्जा विभागाला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुसार ग्रामविद्युत व्यवस्थापकास महावितरणकडून संबंधित ग्रामपंचायतीस प्राप्त होणारी मानधनाची रक्कम प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ३ दिवसांच्या आत संबंधित ग्रामविद्युत व्यवस्थापकास अदा करण्याचे आदेश ग्रामविकास मंत्री महोदयांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामविद्युत व्यवस्थापकास देण्यात येणारे मानधन अत्यंत कमी असून त्यांना किमान वेतनाइतके वेतन देण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने ऊर्जा विभागाने ग्रामपंचायतीस प्राप्त होणारी मानधनाची रक्कम ग्रामविद्युत व्यवस्थापकास अदा करण्याबाबत तसेच किमान वेतनाइतके वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) महावितरणने ग्रामविद्युत व्यवस्थापक यांच्या सेवा पुढे सुरु ठेवाव्यात किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे निर्देशित करुन महावितरणने याबाबत अहवाल देण्याबाबत सूचना बैठकीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील प्रशिक्षित शिक्षकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) १६०११ (२८-१२-२०२२) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्राथमिक शाळामधील विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात घटणार असल्याचे राष्ट्रीय शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद यांनी जाहीर केलेल्या अहवालानुसार माहे ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे सध्या कार्यरत असलेले शिक्षक मोठ्या प्रमाणात अतिरिक्त ठरणार असून नवीन शिक्षकांच्या पदभरतीची शक्यता कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे या कार्यरत शिक्षकांना व प्रतिक्षेत असलेल्या प्रशिक्षित शिक्षकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणते नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (२०-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात येणाऱ्या TAIT २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून त्यामध्ये प्राप्त मुल्यांकनानुसार पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांना तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नियुक्ती देण्यात येत आहे.

---

## नवी मुंबई पोलिसांना वापरासाठी असलेल्या शासकीय वाहनांच्या डिझेल बिलात अनियमितता झाली असल्याबाबत

**(९) १६६१८ (२८-१२-२०२२) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पोलिसांना वापरासाठी असलेल्या शासकीय वाहनांच्या डिझेल बिलात अनियमितता झाली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मुख्यालय उपायुक्तामार्फत चौकशी करण्यात येत असून वापर झालेल्या डिझेलच्या बिलांची तपासणी केली जात आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, सदर चौकशी अहवालात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणात सहायक पोलीस आयुक्त प्रशासन, नवी मुंबई यांनी प्राथमिक चौकशी केली आहे.

(३) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाअंतर्गत मोटार परिवहन विभागातील पोलीस शिपाई चालक यांनी खाजगी व्यक्तींसोबत संगनमत करुन बनावट इंधन बिले खरी आहेत असे दाखवून नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाकडे मंजूरीकरिता सादर करुन स्वत:चा आर्थिक फायदा करुन घेवून महाराष्ट्र शासनाची फसवणूक केली आहे.

प्राथमिक चौकशी अहवालानुसार दोषी आढळुन आलेले पोलीस शिपाई चालक यांना सेवेतून दिनांक १८/१०/२०२२ रोजी निलंबित करण्यात आले असून त्यांच्यासह अन्य संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे. सदर प्रकरणी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय या घटकाकडील कळंबोली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. २१४/२०२२ भा.दं. वि.कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील उपकर इमारतीचा पुर्नविकास करण्याबाबत

**(१०) १७६०३ (२५-०३-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १६६९१ ला दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात १४,२०७ उपकर इमारती असून त्या उपकर इमारतीचा पुर्नविकास करण्याचा प्रस्ताव माहे जानेवारी, २०२२ पासून शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती उपकर इमारतीचा पुर्नविकास झाला आहे व करण्यात येत आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपकर इमारतीचा पुर्नविकास तात्काळ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०६-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

मुंबई शहरात १९६४२ पैकी १३०९१ (जुलै, २०२२) उपकरप्राप्त इमारती अस्तित्वात आहेत.
(२) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत आजपर्यंत ९४१ जुन्या दुरुस्तीपलिकडे घोषित केलेल्या उपकर प्राप्त इमारती संपादित करून त्याजागी नविन ४५४ पुनर्रचित इमारती बांधण्यात आल्या आहेत.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे जुन्या उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासासाठी खाजगी विकासकांना अद्यापपर्यंत २३५८ ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. त्यामध्ये एकूण ४२०१ उपकरप्राप्त इमारतीचा समावेश आहे. आतापर्यंत ९३४ योजनांचे काम पूर्ण झाले असून त्यामध्ये १५४० जुन्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास झाला आहे. तसेच १३५४ योजना प्रगतीपथावर किंवा सुरु होणार असून ज्यामध्ये २५३१ उपकरप्राप्त इमारतीचा समावेश आहे.
(३) उपकरप्राप्त इमारती या खाजगी मालकीच्या असून मालक स्वतःहुन पुनर्विकासासाठी पुढे येत नसल्याने धोकादायक व रखडलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने पूर्ण होण्याकरीता म्हाडा अधिनियम,१९७६ मध्ये दिनांक ०२/१२/२०२२ रोजी सुधारणा करण्यात आल्या आहेत. सुधारीत कलम ७९-अ नुसार धोकादायक उपकर प्राप्त इमारतींचा पुर्नविकास ६ महिन्यात मालक व तद्नंतर ६ महिन्यात भाडेकरु यांनी न केल्यास असे प्रकल्प म्हाडामार्फत पुर्नविकास करण्यात येणार आहे. तसेच, सुधारित कलम ९१-अ मुंबई शहरातील विविध कारणांमुळे अपूर्ण राहिलेले/सोडलेले उपकरप्राप्त इमारतींचे पुनर्विकास म्हाडामार्फत पुर्नविकास करण्यात येणार आहे.

नगरविकास विभागामार्फत विकास नियंत्रण नियमावली ३३(७) व ३३(९) मधील वेळोवेळी सुधारित तरतुदीनुसार उपकरप्राप्त इमारतीच्या मालकांना वाढीव प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यात आला आहे. जेणेकरुन जास्तीत जास्त उपकरप्राप्त इमारतींचे मालक हे भाडेकरु / रहिवाश्यांच्या संमतीने पुनर्विकास योजना हाती घेवू शकतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वडाळा पोलीस स्टेशनसाठी स्वतंत्र इमारत उभारणीस विलंब होत असल्याबाबत

**(११) १७८६३ (२५-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडाळा येथील मुंबई पोर्ट ट्रस्टच्या (बीपीटी) भूखंडावर बांधलेल्या इमारतीत सन १९६८ मध्ये वडाळा पोलीस स्टेशन सुरू करण्यात आले होते, काही वर्षांपूर्वी सदर इमारतीची दुरवस्था झाल्यानंतरही तांत्रिक अडचणीमुळे या मोडकळीस व अत्यंत धोकादायक असलेल्या इमारतीमध्येच पोलीस स्टेशनचे कामकाज सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत ४ वर्षांपासून वडाळा येथील मुंबई पोर्ट ट्रस्टच्या इमारत क्रमांक ३२ मध्ये वडाळा पोलीस स्टेशन स्थलांतरित करण्यात आले असून सदर इमारतीच्या १६ खोल्यांमध्ये पोलीस स्टेशनचे

कामकाज सुरु असून पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांच्या कामाचा वाढता व्याप पाहता सदर जागा अपुरी पडत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वडाळा पोलीस स्टेशनसाठी नवीन स्वतंत्र सुसज्ज इमारतीच्या उभारणीसंदर्भात पोलीस प्रशासनाकडून सातत्याने मागणी होत असूनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वडाळा पोलीस स्टेशनसाठी नवीन इमारत उभारणीसंदर्भात निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करून वडाळा पोलीस स्टेशनची नवीन इमारत कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२३) : (**१), (२), (३) व (४) होय.

दिनांक १२/०५/२०२२ रोजी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयामार्फत वडाळा पोलीस ठाणे आणि पोलीस वसाहत पुनर्विकास प्रस्ताव पोलीस गृहनिर्माण महामंडळास प्राप्त झालेला आहे. सदर प्रकल्पाचे जागेची मालकी मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचे नावे नोंद असून त्यांचे कार्यालयामार्फत "ना-हरकत" मिळणेबाबत कार्यवाही पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयामार्फत प्रगतीत आहे.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयामार्फत दिनांक ३१/०५/२०२३ रोजीचे पत्रान्वये हार्बर रेल्वे प्राधिकरण कार्यालयामार्फत त्यांचे "ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणेची कार्यवाही पोलीस गृहनिर्माण महामंडळामार्फत प्रगतीत आहे. प्रकल्पाची जागा व निधी उपलब्ध झाल्यानंतर पोलीस गृहनिर्माण महामंडळामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील साने गुरूजी मार्गावरील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(१२) १८७९१ (१९-०६-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील साने गुरूजी मार्गावरील शिंदे चाळीतील इमारत क्रमांक १४५ डी, १४५ ई, १४५ एफ, १४७-१५१, १५३-१५५, बोहरी चाळीतील इमारत क्रमांक १२७-१२९, पानबाई निवास येथील इमारत क्रमांक १३१-१३३, मोतीवाणी चाळीतील इमारत क्रमांक १३७-१४१ व पानसरे चाळीतील इमारत क्रमांक १४५, १४५ अे, १४५बी, १४५सी, १४५जी या इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प गेल्या ४५ वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाकरीता सन १९८७ पासून इमारती निष्कासित करण्यात येवून येथील रहिवाशांना संक्रमण शिबिरात स्थलांतरीत करण्यात आले असून सदरहू इमारतींच्या पुनर्विकासाकरीता भूसंपादनाच्या प्रक्रियेस विलंब होत असल्याने या इमारतींच्या पुनर्विकासास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग, दुवपु मंडळ यांनी त्यांचे पत्र क्रमांक २७८७, दिनांक २२ मे, २०१९ अन्वये उपमुख्य अभियंता/परिमंडळ-३, दुवपु मंडळ यांचेकडे सादर केलेल्या उक्त मिळकतींच्या

भूसंपादनाच्या सविस्तर प्रस्तावाची छाननी करून सदरचा प्रस्ताव क्रमांक १५९९, दिनांक १३ जून, २०१९ रोजी उपमुख्य अभियंता/परिमंडळ-३, दुवपु मंडळ यांनी पुढील कार्यवाहीस्तव गृहनिर्माण विभागाकडे पाठविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रस्तावामध्ये कोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या असून नमूद इमारतींपैकी कोणकोणत्या इमारतींचा भूखंड म्हाडा अधिनियम १९७६ च्या कोणकोणत्या नियमान्वये संपादित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून त्याची सविस्तर कारणे काय आहेत,
(५) असल्यास, तसेच उक्त नमूद इमारतींच्या पुनर्विकासाच्या अनुषंगाने भूखंड संपादित करण्याची कार्यवाही किती कालावधीत करण्यात येणार असून या इमारतींच्या पुनर्विकासाच्या कामास प्रत्यक्ष सुरवात किती कालावधीत होणार आहेत, त्याचप्रमाणे भूसंपादनाच्या कार्यवाहीस विलंब होत असल्यास त्याची कारणे काय आहेत,
(६) असल्यास, सदरहू प्रकरणी कार्यकारी अभियंता/ई-२ विभाग, दुवपु मंडळ व उपमुख्य अभियंता/परिमंडळ-३, दुवपु मंडळ यांचेकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसून यास जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे तसेच उक्त नमूद इमारतींचा पुनर्विकास तातडीने करून येथील सदनिकाधारकांना त्यांची न्याय हक्काची घरे लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही केली असल्यास त्याचा तपशील काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०१-११-२०२३) :** (१), (२) व (३) इमारत क्र. १४५ एफ शिंदे चाळ, साने गुरूजी मार्ग व लगतच्या इ. क्र. १४५डी, १४५ई, १५३-१५५, ४३९सी, ४३९डी, १४५एफ, १४५जी, १४५एफएफ, १४७ -१५१, १५३- १५५, ४३९ व ४३९अब या इमारतींच्या संयुक्त पुर्नबांधणी योजनकरीता भूसंपादनाची प्रक्रिया मंडळाने सन १९८० मध्ये सुरु झाली होती. तथापि, प्रत्यक्ष ताबा घेण्यापूर्वी इ.क्र.१४५ एफ, इमारतीचे मालक श्रीमती शिंदे यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.१३११/८३ अन्वये भूसंपादन प्रक्रियेस आव्हान दिले होते. त्यामध्ये म्हाडा अधिनियम ८८ (३)(ब) अन्वये दिलेले प्रमाणपत्र रद्द ठरवून भूसंपादन प्रक्रिया पुनश्चः करण्याचे आदेश दिले. त्यानुसार मंडळाच्या दिनांक २७/०९/१९९३ रोजीच्या बैठकीद्वारे भूसंपादनास मान्यता दिलेली आहे.

मंडळाने दिनांक १२/१०/२०१८ व दिनांक ०१/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये वास्तुशास्त्रज्ञ यांची भुकर पाहणी क्र. २०५४, २०५५, २०५६, २०५८, १/२०५८, २/ २०५८, २०५९, १/२०५९, २०६०, २०६१, १/२०६१, २/२०६१, ३/२०६१, २०६२, २०६३, २०६४, २०६५, भायखळा विभाग या मालमत्तांच्या संयुक्त पुनर्विकास योजना राबविण्यासाठी व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी नेमणूक केली आहे. सदरहू वास्तुशास्त्रज्ञ यांच्या दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या अहवालामध्ये त्यांनी, DCPR २०३४ मध्ये सर्व भूखंड हे निवासी क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. परंतु भूकर पाहणी क्र. २०५८ व २०५९ या भूखंडावर RG आरक्षण दर्शविले असून संयुक्त पुनर्विकास योजना व्यवहारिकदृष्टया योग्य असल्याचे नमुद केले आहे परंतु RG आरक्षण हे भुकर पाहणी क्र. २०५८ व २०५९ ऐवजी १/२०५६ या भूखंडावर हलविल्यास विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अंतर्गत अनुज्ञेय असलेला संपूर्ण चटई क्षेत्र निर्देशांक वापरणे शक्य होईल असे नमूद केले आहे. सदर योजनेंतर्गत भुकर पाहणी क्र. २०५४, २०५५, २०५६, २०५८, १/२०५८, २/२०५८, २०५९, १/२०५९, २०६०, २०६१, १/२०६१, २/२०६१, ३/२०६१,

२०६२, २०६३, २०६४, २०६५, भायखळा विभाग व यावरील इमारतींचा समावेश संयुक्त पुनर्विकास योजनेमध्ये करण्यात आला आहे. सदर योजनेंतर्गत एकूण ६७४ निवासी + ५२ अनिवासी असे एकूण ७२६ भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित केले आहे.

या समूह विकास योजनेअंतर्भुत एकूण १४ भुखंडापैकी ३ भुखंडांचे भूसंपादन करण्यात आले आहे. उर्वरित ११ भूखंडांचे भुसंपादन करण्याकरीता वास्तुशास्त्रज्ञ यांनी दिनांक २५/०५/२०२३ रोजी सादर केलेल्या व्यवहार्यता अहवाल (Feasibility Report) प्रस्ताव सुधारीत करुन फेरसादर करण्याची कार्यवाही मंडळाकडून करण्यात येत आहे. तद्नंतर शासनाची भूसंपादनाकरीता मान्यता घेवून पुनर्विकासाचे काम सुरु करता येईल.

(४)

| अ.क्र. | भूसंपादनर करण्याच्या भूखंडाचे CTS क्र. | म्हाडा अधिनियम कलम | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| १ | २०६१ | म्हाडा अधिनियम कलम ९३(१) खाली | २०६१ भूसंपादन झाले असून म्हाडाच्या नावाने मालमत्ता पत्रक अद्ययावत झाले आहे. |
| २ | २०६३ | | भूसंपादन झाले असून म्हाडाच्या नावाने मालमत्ता पत्रक अद्ययावत करणे बाकी आहे. |
| ३ | २०६० | | सकृत दर्शनी मालमत्ता पत्रक म्हाडाच्या नावावर अद्ययावत झाल्याचे दिसून येते. |
| ४ | २०५४, २०५५, २०५६, २०५८ (भाग), २०५९ (भाग), १/२०६१, २/२०३/२०६१, २०६४, २०६५, २०६२ (मंदिर) | म्हाडा अधिनियम कलम ९३(१) खाली भूसंपादनाचा प्रस्ताव सादर केला आहे. | भूसंपादन होणे बाकी आहे. |

(५) व (६) या समूह विकास योजनेअंतर्भुत एकूण १४ भुखंडापैकी वर नमुद केल्याप्रमाणे ३ भुखंडांचे भूसंपादन करण्यात आले आहे. उर्वरित ११ भुखंडांचे भुसंपादन करण्याकरीता प्रक्रिया सुरु आहे.

---

## पुणे शहरातील वाघोली भागामध्ये "शुभ सजावट" या मंडपाच्या गोडाऊनला भीषण आग लागून तीन जणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१३) १८९९० (०४-०८-२०२३) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वाघोली भागामध्ये "शुभ सजावट" या मंडपाच्या गोडाऊनला दिनांक ७ मे,२०२३ रोजी वा त्या सुमारास भिषण आग लागून त्यात तीन जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोडाऊन मधे लग्न समारंभ व सजावट, लायटिंग, वायर कुशन व कारपेट असे आग पकडणाऱ्या वस्तु असून सदर आगीत ४ सिलेंडर देखील फुटले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर आग लागण्याची कारणे काय, तसेच आगीत मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१) व (२) होय, सदर आग आटोक्यात आल्यानंतर केलेल्या पाहणीमध्ये घटनास्थळी लग्न समारंभ सजावट व मंडपाचे साहित्य, लोखंडी खुर्च्या, टेबल, कापडी फ्लॉवर्स, लोखंडी जाळ्या इ. साहित्य तसेच, सिलेंडरच्या फुटलेल्या २ टाक्या आणि शाबुत असलेल्या २ टाक्या आढळून आल्या आहेत.
(३) शुभ सजावट गोडाऊन, साई सत्यम पार्क, उबाळेनगर, वाघोली, जि.पुणे या ठिकाणी मंडपाच्या गोडाऊनला आग लागल्याच्या घटनेबाबत फिर्याद प्राप्त झाल्यानंतर लोणीकंद पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३६४/२०२३, भा.दं.वि.कलम ३०४ (अ) प्रमाणे दिनांक ०९/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विषयाधीन दुर्घटनेमध्ये ३ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. सदर घटनेतील मृत कामगारांच्या वारसांना तातडीने नुकसान भरपाई म्हणून गोडाऊन मालकाने रक्कम अदा केली आहे. उर्वरीत/अधिकची भरपाई मिळणेकरीता दुर्घटनेमध्ये मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटूंबीयांनी कामगार न्यायालयात दाद मागितली असून कामगार न्यायालयामध्ये दिनांक १०/०५/२०२३ रोजी खटला दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांच्याकडून अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांच्या वेतनातील फरकाची रक्कम अदा करणेबाबत

**(१४) १९३०५ (०४-०८-२०२३) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे, यांच्याकडून मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांच्या वेतनातील फरकाची रक्कम अदा करणेबाबत विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालयांतील प्राचार्यांच्या वेतनातील फरकाची रक्कम अदा करण्याबाबत लागणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत, तसेच याबाबतची वस्तुस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर महाविद्यालयातील प्राचार्यांच्या वेतनातील फरकाची रक्कम अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही,

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार महाविद्यालयनिहाय तसेच कर्मचारीनिहाय देय ठरणारी रक्कम संबंधित महाविद्यालयांच्या वेतन खात्यामध्ये दिनांक १६/०५/२०२३ रोजी जमा केली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कारंजा (जि. वर्धा) तालूक्यातील माळेगांव (ठेका) ते सुकळी (बाई) यांना जोडणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याबाबत

**(१५) १९३७३ (०४-०८-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळेगांव (ठेका) ते सुकळी (बाई) (ता.कारंजा, आर्वी, जि.वर्धा) यांना जोडणाऱ्या रस्त्याची गत ८ वर्षांपासून दुरवस्था झाली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही,

सदर रस्त्यावर वार्षिक देखभाल दुरुस्तीचे मंजूर कामामधून खड्डे भरुन रस्ता वाहतूकीस योग्य ठेवण्यात आला आहे.
(२) सदर रस्त्यावर सा.क्र. कि. मी. ०/०० ते १७/०० या लांबीत रुपये १४.५० कोटीचे काम मंजूर करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन दिनांक ३०-०६-२०२३ रोजी कामांचा कार्यारंभ आदेश देण्यात आले असून सदरचे काम डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जामनेर (जि.जळगाव) येथील कमानी तांडा या प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१६) २०१६३ (०४-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) जामनेर (जि.जळगाव) येथील कमानी तांडा या प्रकल्पाचे काम गत वीस वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाला विलंब होत असल्याने संबंधित प्रकल्पाची किमंत ६ पटीने वाढली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

सात साठवण बंधाऱ्यांचे व दोन पाझर तलावांचे कामे पूर्ण असून सुप्रमाअभावी अनुषंगिक कामे बाकी आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

कमानीतांडा मध्यम प्रकल्पास सन १९९८ मध्ये रुपये ४२.२२ कोटी इतक्या रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. द्वितीय सुप्रमा प्रस्ताव रुपये ३७४.९३ कोटी किमतीचा असून रा.तां.स.स,नाशिक यांना सादर आहे. सदर प्रकल्पावर ऑगस्ट २०२३ पर्यंत खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | शिर्ष | झालेला खर्च रुपये लक्ष |
|---|---|---|
| १ | कामावर | ५०९५.२६ |
| २ | भुसंपादनावर | १६२२७.७२ |
| ३ | अनुषंगिक | ९९.४९ |
| | एकूण | २१४२२.४७ |

भुसंपादनामधील न्यायालयाच्या निकालानुसार वाढीव मोबदल्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे.

(३) कमानीतांडा मध्यम प्रकल्पाचा द्वितीय सुप्रमा प्रस्ताव रुपये ३७४.९३ कोटी, रा.तां.स.स,नाशिक यांना महामंडळाचे पत्र क्र.तापाविम/प्रशा-५/३५३५, दिनांक २५/०७/२०२३ अन्वये सादर असून छाननीच्या कार्यवाहीत आहे. त्यांचेकडुन सहमती प्राप्त होऊन शासनाकडे प्रस्ताव आल्यानंतर त्यास सुप्रमा प्रदान करण्याबाबत पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## महातपुरी (जि.परभणी) येथील तरुणीचे अपहरण झाल्याबाबत

**(१७) २०१९० (०४-०८-२०२३) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महातपुरी (जि.परभणी) येथील एका तरुणीचे गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी अपहरण केल्याबाबतची तक्रार तिच्या पालकांनी जिल्हाधिकारी परभणी व जिल्हा पोलीस अधीक्षक परभणी यांच्याकडे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रार अर्जात नमूद केल्याप्रमाणे संबंधित संशयित व्यक्तींची चौकशी करून त्यांना ताब्यात घेवून त्यांना अटक करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अपहरित तरुणीचा शोध घेण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनामार्फत संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१) नाही.

अशा आशयाचे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही. परंतु दिनांक २१ मे, २०२३ रोजी महातपुरी येथील तक्रारदार यांची मुलगी घरात कोणालाही न सांगता घरातून निघून गेल्याची तक्रार सोनपेठ पोलीस स्टेशन, परभणी येथे प्राप्त झाली आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीनुसार सोनपेठ पोलीस स्टेशन, परभणी येथे क्र.१७/२०२३ अन्वये मिसींग दाखल करण्यात आली. सदर मिसींग नुसार चौकशी करण्यात आली. चौकशी दरम्यान दिनांक ०८/०६/२०२३ रोजी मुलगी पोलीस स्टेशन येथे हजर होऊन ती स्पर्धा परीक्षा देण्यासाठी कोणालाही न सांगता पुणे येथे गेले असल्याचे व तिचे अपहरण झाले नसल्याचे तीने जबाबात सांगितले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांना अनुदान धोरण लागू करण्याबाबत

**(१८) २०३२० (०४-०८-२०२३) श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपूर विद्यापीठाचे अधिनियम १९९७, नियम ६२ (५) नुसार या विद्यापीठाशी संलग्नित नविन महाविद्यालयांना शासन मान्यता देतांना दरवर्षीच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करावी लागत असल्याचे माहे जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षी नवीन महाविद्यालयांना शासन मान्यता देताना अशी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सन २००१ पासून लागू केलेल्या विनाअनुदान धोरणात अकृषिक विद्यापीठांचा उल्लेख / समावेश असल्याने शासनाद्वारे स्थापित भाषिक विद्यापीठास विनाअनुदान धोरण लागू नसताना कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक या विद्यापीठाअंतर्गत नवीन महाविद्यालयांना विनाअनुदान तत्वावर परवानगी दिली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयांना अनुदान धोरण लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (३१-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सन २००१ पासून कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर खाजगी क्षेत्रात नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे धोरण स्विकारण्यात आले आहे. सदर धोरणानुसार कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक अंतर्गत नवीन महाविद्यालयांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात येते.
(४) शासनाच्या प्रचलित उपरोक्त धोरणानुसार कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयांना अनुदान देण्यात येत नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## महानिर्मिती कंपनीतील तंत्रज्ञ - ३ सरळसेवा भरती मध्ये मेकॅनिकल डिझेल, मशिनिस्ट या ट्रेड चा शैक्षणीक अर्हतामध्ये समावेश करणेबाबत

**(१९) २०८८२ (२७-०७-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य विज महामंडळाच्या प्रशासकीय परिपत्रक क्र. २०७ नुसार दिनांक २७/०१/१९९७ च्या परिपत्रकानुसार शिकाऊ प्रशिक्षण यशस्विरीत्या पूर्ण केलेल्या उमेदवारांकरीता श्रेणी ३ व श्रेणी ४ सरळ सेवा भरतीमध्ये १० टक्के जागा आरक्षित करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यात डिझेल मेकॅनिक, मशिलिस्ट ग्रॅंडर, मोटर मेकॅनिक या ट्रेड चा समावेश होता परंतु, सध्याच्या महानिर्मिती कंपनीमध्ये ही ट्रेड सरळ सेवा भरतीकरीता बंद करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संपूर्ण महाराष्ट्रातील सुशिक्षीत बेरोजगार आयटीआय विद्यार्थांवर या ट्रेड बंदीद्वारे सरळ सेवा भरतीत त्यांना लाभ होत नसल्याने त्यांचेवर अन्याय होत असून वरील ट्रेड मध्ये जवळपास २०१६ पात्र उमेदवारांची यादी असूनसुध्दा त्यांना कुठलाही लाभ देण्यात आलेला नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने डिझेल मेकॅनिक, मशिनिस्ट, मोटर मेकॅनिक या ट्रेडचा समावेश महानिर्मिती कंपनीतील तंत्रज्ञ - ३ जाहिरातीत शैक्षणीक अर्हतामध्ये समावेश करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-११-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. तत्कालिन म.रा.वि.मंडळामध्ये प्रशासकीय परिपत्रक क्र.२०७, दिनांक २७/०१/१९९७ मध्ये तत्कालिन म.रा.वि.मंडळातून शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारांना श्रेणी-०३ व ०४ पदांच्या सरळसेवाभरतीमध्ये १०% जागा आरक्षित ठेवण्याबाबत नमूद केले आहे. परंतु सदरील परिपत्रकात कोणत्याही विशिष्ट आयटीआय व्यवसायाचा उल्लेख नव्हता. तसेच सदरील परिपत्रक तत्कालिन म.रा.वि.मंडळासाठी लागू असून, त्यानंतर सन-२००५ मध्ये तत्कालिन म.रा.वि.मंडळाचे विभाजन होऊन ०३ कंपन्या अस्तित्वात आल्या. महानिर्मिती कंपनी अस्तित्वात आल्यानंतर महानिर्मिती कंपनीसाठी उपयुक्त आय.टी.आय. व्यवसाय पूर्ण केलेले तसेच तत्कालिन म.रा.वि.मंडळ व महानिर्मिती येथे शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेले उमेदवारांना तंत्रज्ञ-३ पदाच्या सरळसेवा भरतीत १०% आरक्षण देण्यात येते.

तसेच सध्यस्थितीत महानिर्मिती कंपनीकरीता तंत्रज्ञ-३ पदाच्या सरळसेवा भरतीत खालील नमूद शैक्षणिक अर्हता/आयटीआय व्यवसायांची आवश्यकता असते.

१) इलेक्ट्रीशियन (वीजतंत्री) २) वायरमन (तारतंत्री) ३) मशिनिस्ट (यंत्र कारागीर) ४) फिटर (जोडारी) ५) इलेक्ट्रॉनिक्स / इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक / इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अ‍ॅन्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेंटेनन्स ६) इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन सिस्टीम ७) वेल्डर (संधाता) ८) इन्स्ट्रयुमेंट मेकॅनिक ९) ऑपरेटर कम मेकॅनिक पोल्युशन कंट्रोल इक्वीपमेंट १०) बॉयलर अटेंडन्स ११) स्विच बोर्ड अटेंडन्स १२) स्टिम टर्बाईन ऑक्झीलरी प्लॅंट ऑपरेटर/ स्टिम टर्बाईन ऑपरेटर १३) ऑपरेटर कम मेकॅनिक मटेरिअल हॅंडलींग इक्वीपमेंट १४) ऑपरेटर कम मेकॅनिक (पावर प्लॅन्ट) या शासनमान्य आय.टी.आय/ NCTVT/MSCVT उत्तीर्ण.

(३) व (४) महानिर्मिती कंपनीसाठी आवश्यक व उपयुक्त असलेल्या आय.टी.आय व्यवसायांचा तंत्रज्ञ-३ पदाच्या सरळसेवा भरतीमध्ये शैक्षणिक अर्हतेत समावेश करण्यात येतो व त्यानुसार सरळसेवा भरती राबविण्यात येते. तसेच डिझेल मेकॅनिक, मशिनिस्ट ग्राईडर, मोटर मेकॅनिक हे आयटीआय व्यवसाय तंत्रज्ञ-३ पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेत समाविष्ट नसल्याने संबंधित व्यवसाय उत्तीर्ण उमेदवारांचा विचार करण्यात आला नाही. याशिवाय महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रगत कुशल प्रशिक्षणार्थीसाठी कोणताही आयटीआय व्यवसाय उत्तीर्ण असल्याची मुभा असल्याने, तंत्रज्ञ-३ पदाच्या सरळसेवा भरतीवेळी महानिर्मितीतील पात्र प्रकल्पग्रस्त प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी ज्यांनी डिझेल मेकॅनिक, मशिनिस्ट ग्राईडर, मोटर मेकॅनिक व्यवसाय उत्तीर्ण केले आहेत व ज्यांनी किमान एक वर्षाचे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केले आहे अशा पात्र प्रकल्पग्रस्तांना अर्ज करण्याची मुभा असते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे तुळसवडे (ता. राजापूर, जि. रत्नागिरी) मधील रस्त्यावरील पुलाच्या निकृष्ट बांधकामाबाबत

**(२०) २०९५३ (०४-०८-२०२३) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तुळसवडे (ता. राजापूर, जि. रत्नागिरी) मधील प्र.जि.मा.५/७८० या रस्त्यावरील पुलाच्या बांधकामास मंजुरी मिळून २ वर्षे होवूनही अद्यापपर्यंत काम सुरू झालेले नसून प्र.जि.मा.६/६२० या

रस्त्यावरील फुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झालेले असून याबाबत अनेक तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झालेले असतानादेखील सदर ठेकेदाराचे देयक काढण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्र.जि.मा.५/७८० या रस्त्यावरील पुलाच्या बांधकामास मंजुरी २ वर्षापूर्वी मंजूरी मिळूनही अद्याप काम सुरु न करण्याबाबत तसेच प्र.जि.मा.६/६२० या रस्त्यावरील फुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असूनही ठेकेदाराची देयके अदा करण्यात येणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१७-११-२०२३) :** (१) व (२) रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील सौंदळ आडवली तुळसवडे ताम्हाणे मिंलंद हातदे रस्ता प्राजिमा क्र.६६ कि.मी. ५/७८० मध्ये पुलाचे बांधकाम करणे या रक्कम रुपये १५०.०० लक्ष चे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक ११/०७/२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदरचे काम दिनांक १०/०७/२०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच सदर रस्त्यावर सा.क्र कि.मी. ६/६२० मध्ये पुलाचे बांधकाम करणे या रक्कम रुपये ९० लक्षाचे मंजूर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक १३/०१/२०२२ रोजी देण्यात आले आहेत. मुख्य पुलाचे काम पूर्ण करण्यात आले असून जोड रस्त्याचे काम प्रगतीत आहे. सदरचे काम करारनाम्यातील तरतूदी प्रमाणे करण्यात आले असून क्षेत्रिय कार्यालयात सदर कामाच्या गुणवत्तेबाबत तक्रार प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.